नियमीत फौजदारी खटला क्र. **१३१/२०२२**
निशाणी क्र. **४२/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०१** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **मंदार अरुण पाटील** |
| वय सुमारे | : | ३९ वर्षे, व्यवसाय : केक शॉप |
| निवासस्थान | : | मु. विद्यानगर, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती नईमा घट्टे यांचेमार्फत</u>** :

दि. ०२/०१/२०१२ रोजी मला पोलीसांनी मांडवा येथील दस्तुरी नाका येथे पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. तेथे पोलीस, वार्डे आणि ज्याने तक्रार दिली तो इसम असे हजर होते. घटनास्थळ मोहन शहा यांनी दाखविले. घटनास्थळी त्यावेळेला झाडे तोडलेली व काही झाडे जाळलेली होती. सदर जागा अंदाजे १६ एकर होती. पंचनामा सायं. ४.०० ते ४.३० वाजता सुरु झाला व सुमारे ५.०० वाजता संपला. मला दाखवण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी अनु.क्र. ०१ वर सही आहे. पंचनामा **निशाणी क्र. ४३** वर आहे.

**सरतपास संपला**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. अंकीत बंगेरा यांचेमार्फत</u>** :

०२. सन २०१२ मध्ये माझे साड्यांचे दुकान होते. मोहन शहा याच्या सांगण्यावरुन मी अलिबाग येथून मांडव्याला गेलो. हे म्हणणे खरे आहे की, मोहन शहा माझ्या परिचयाचे असल्याने मी मांडवा येथे गेलो. मोहन शहा हा माझ्या मित्राच्या चांगल्या परिचयाचा आहे. मी त्या दिवशी माझ्या मित्राच्या कुटुंबियांसोबत

गेलो. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे मोकळी जागा आहे, तेथे कोणतेही कम्पाउंड नाही तेथे कोणीही येवू जावू शकते. माझ्या अंदाजाने तीन ७/१२ होते. मला प्रत्येक ७/१२ उताऱ्यावर किती क्षेत्र होते हे सांगता येणार नाही. मी माझ्या मित्राला कशासाठी जायचे आहे, कुठे जायचे आहे ते विचारले नव्हते. मी घटनास्थळावरुन माझ्या घरी ६.०० ते ६.३० वाजताच्या दरम्यान पोहोचलो. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्याला जाण्यापूर्वी माझ्या मित्राने मला घटनास्थळी झाडे तोडली असे सांगितले. मी त्या दिवशी पंचनाम्यावर एकच सही केली. घटनास्थळाच्या आजूबाजूला थोडीफार घरे होती. पोलीसांनी माझ्या समक्ष त्या आजूबाजूच्या घरातील इसमांकडे चौकशी केली नाही. घटनास्थळावरुन काही जप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनामा करण्यासाठी घटनास्थळी गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मित्राच्या सांगण्यावरुन व मोहन शहा याच्या सांगण्यावरुन मी पोलीस ठाण्यात सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनाम्यासाठी गेलेलो नसल्यामुळे पंचनाम्याची चुकीची वेळ सांगितली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **२४/०६/२०२४**.

( **श्रीमती एस्. डी. सोनी** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१३१/२०२२**
निशाणी क्र. **४९/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०२** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **शोएब नियाज पल्लवकर** |
| वय सुमारे | : | ३८ वर्षे, व्यवसाय : वाहनचालक |
| निवासस्थान | : | मु. अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती नईमा घट्टे यांचेमार्फत</u>** :

दि. १०/०१/२०१२ रोजी मला मांडवा सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस गावीत यांनी आर.सी.एफ्. जेट्टीजवळ पंचनामा करण्यासाठी बोलावले होते. पंचनामा जागेचा होता. घटनास्थळ मोहन शहा याने दाखवले होते. घटनास्थळ हे दस्तुरी नाक्याजवळ मांडवा रेवस रोडवर होते. त्या जागेचा गट नं. २६२ असा होता. घटनास्थळी दोन क्रिकेटचे पिच होते आणि एका पिचवर स्टम्प लावलेला होता. गवताची झाडे तोडलेली होती. ती जागा अंदाजे २२ एकर होती. पंचनामा १.३० वाजता सुरु झाला व २.३० वाजता संपला. आता मला दाखवण्यात आलेला पंचनामा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर अनु. क्र. १ वर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. ५०** देण्यात येते.

**सरतपास संपला**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. एस्. एन्. जोशी यांचेमार्फत</u>** :

२. कोणत्या जागेला कोणता गट क्रमांक आहे हे मला निश्चित सांगता येणार नाही. ज्या जागेवर मी उभा होतो त्या जागेचा गट क्रमांक मला निश्चित सांगता येणार नाही. मी त्या दिवशी मांडवा सागरी पोलीस ठाण्याच्या

भागात कामासाठी गेलो होतो तेव्हा पोलीसांनी मला बोलावले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्या जागेत फुलझाडे किंवा उत्पन्न देणारी झाडे नव्हती. घटनास्थळी जाळपोळ केल्याची चिन्हे नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, ती जागा खुली जागा आहे. हे म्हणणे खरे आहे की, तेथे तोडफोड करण्यासारखे काही नव्हते. माझ्या समक्ष ती जागा मोजलेली नव्हती. मी फिर्यादीला ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला त्यावेळेला घटनास्थळी कोण हजर होते त्यांची नावे सांगता येणार नाहीत. असे काही घडले नाही की, मी पाहणी केली व पोलीसांना सांगितले त्याप्रमाणे पोलीसांनी लिहीले. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी पंचनामा आधीच तयार केला होता मी त्यावर फक्त सही केली. हे म्हणणे खरे आहे की, मला पंचनाम्यात काय लिहीले आहे याची माहिति नाही. मला जागेच्या चतु:सीमा सांगता येणार नाहीत. त्या जागेत गवतही उगवलेले नव्हते. मी पंचनाम्यावर सही केल्याची निश्चित वेळ मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात दिलेला पुरावा चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी पंचनामा केला हे मी खोटे सांगितले आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **१४/०८/२०२४**.

( **श्रीमती एस्.डी. सोनी** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.

नियमीत फौजदारी खटला क्र. **१३१/२०२२**
निशाणी क्र. **६४/क**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. **०३** यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की :

| | | |
|---|---|---|
| माझे संपूर्ण नांव | : | **यतीन चंद्रकांत पटेल** |
| वय सुमारे | : | ५८ वर्षे, व्यवसाय : व्यापार |
| निवासस्थान | : | नेपीयनसी रोड, मुंबई |

**<u>सरतपासणी सरकारतर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती नईमा घट्टे यांचेमार्फत</u>** :

०१. सन २०११ मध्ये मी मुंबई येथे राहात होतो. मांडवा येथे माझ्या सासऱ्यांचे घर आहे. सदर जागेचे गट क्र. २१४/ए१, २१४/बी व २६२ असे आहेत. सदर जागेवर मांडवा ग्रामस्थांनी अतिक्रमण केल्यासंदर्भात माझ्या सासऱ्यांनी मला सांगितले होते. त्यांनी झाडे तोडून जाळपोळ केली होती. माझ्या सासऱ्यांनी मला सांगितले की, त्यांनी मांडवा पोलीस ठाण्यात दि. २४/१२/२०११ रोजी तक्रार केलेली आहे. त्यांनी मला सांगितले की, तुम्हाला दि. ०२/०१/२०१२ रोजी घटनास्थळाच्या पंचनाम्यासाठी यायचे आहे. मी दि. ०२/०१/२०१२ रोजी घटनास्थळ पंचनाम्यासाठी गेलो होतो. पंचनाम्यासाठी मी, माझे सासरे, माझी मेहुणी गीता मोहन शहा, सिद्धेश वार्डे, पुरुषोत्तम शहा हजर होते. घटनास्थळी झाडे तोडलेली आहेत व जाळपोळ केलेली आहे.

०२. त्यानंतर दि. १०/०१/२०१२ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलावले होते. त्या दिवशी पुन्हा त्याच घटनास्थळी गेलो होतो व घटनास्थळाचा पंचनामा केला होता. आम्हाला त्या दिवशी घटनास्थळी झाडे तोडल्यासंदर्भात व

जाळपोळ केल्यासंदर्भात आढळून आले. मी आरोपींना ओळखू शकणार नाही.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास आरोपीकरीता वकील श्री. एस्. एन्. जोशी यांचेमार्फत</u>** :

०३. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सासऱ्यांनी मला जे सांगितले होते ते मी पोलीसांना सांगितले. मला कोणकोणती झाडे घटनास्थळी होती त्यांची नावे आता सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, झाडे जंगली होती. हे म्हणणे खरे नाही की, झाडे जाळण्यामुळे माझ्या सासऱ्यांना नुकसान झाले नव्हते. झाडे जाळल्यामुळे नुकसान झाले होते.

०४. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सासऱ्यांमध्ये व ग्रामस्थांमध्ये पूर्वीपासून जागेसंदर्भात वाद आहेत. हे मला माहीत नाही की, अलिबाग न्यायालयात दोन्ही दावे खारीज झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, जिल्हा न्यायालयात त्या संदर्भात माझ्या सासऱ्यांनी अपील दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, अपीलामध्ये दावे मंजूर झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्याविरोधात ग्रामस्थांनी हायकोर्टात अपील दाखल केले होते. मी हायकोर्टाचे जजमेंट वाचले नाहीत परंतु ते माझ्या सासऱ्यांच्या लाभात झालेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, जजमेंटमध्ये असे लिहीले होते की, जमीनाचा ताबा ग्रामस्थांकडे आहे व मालकी माझ्या सासऱ्यांकडे आहे. हे मला माहीत नाही की, सुप्रिम कोर्टानेही सांगितले होते की ताबा ग्रामस्थांकडे आहे व मालकी माझ्या सासऱ्यांकडे आहे.

०५. हे मला सांगता येणार नाही की, मी पंच म्हणून काम केलेले नाही मी फक्त साक्षीदार आहे. हे म्हणणे खरे आहे की, पंच माझ्या सासऱ्यांनी आणले होते. पंच कोण होते ते मला माहीत होते. मोहन शहा व गीता शहा हे पंच होते.

गट क्र. २१४/ए१, २१४/बी व २६२ ह्या गट क्रमांकावर घटना घडली होती जास्त घटना गट क्र. २१४/ए१ वर झाली होती.

०६. ७/१२ उतारा साक्षीदारास दाखवण्यात आला. उलटतपासामध्ये ७/१२ उतारा दाखवण्यात आला त्यामुळे त्यास **निशाणी क्र. ६५** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, ७/१२ उताऱ्यामध्ये गवत लिहीलेले आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, परंतु फक्त गवत नव्हते. झाडे असल्यासंदर्भात माझ्याकडे फोटो आहेत. मी फोटो पाहून सांगू शकतो की ती कोणती मिळकत आहे. मिळकत रस्त्याच्या दोन्ही बाजूला होती.

०७. मला हे माहीत नाही की, माझ्या सासऱ्यांनी त्या संदर्भात माहिती गॅस कंपनीला दिलेली आहे की नाही. हे म्हणणे खरे आहे की, त्या मिळकतीमधून गॅस पाईपलाईन जात आहे.

०८. हे म्हणणे खरे नाही की, मी कधीही घटनास्थळी गेलो नव्हतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कोणताही पंचनामा झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सासऱ्यांच्या सांगण्यावरुन पोलीसांना खोटा जबाब दिलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

अलिबाग.
दिनांक : **१२/०१/२०२६**.

( **एम्. बी. अत्तार** )
मुख्य न्यायदंडाधिकारी, रायगड–अलिबाग.